# नियामक मंडळाची ३७ वी बैठक दिनांक २ डिसेंबर २००३

मा. ना. अजित पवार, मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ३७ वी बैठक दि.२.१२.२००३ रोजी पाटबंधारे सभागृह, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र.३७/१

''ठराव करण्यात येतो की, ३६ व्या बैठकीमध्ये पारित केलेले सर्व ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्रमांक ३७/२

"ठराव करण्यात येतो की, सोबतच्या परिशिष्ट क्र.१ मध्ये दर्शविलेल्या ४ मोठे, १ मध्यम व ६ लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या अंदाजपत्रकांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे."

ठराव क्र. ३७/३

''ठराव करण्यात येतो की, शासनाने क्र. कोयना १००२/(१२०/०३)जवि दि.४.११.०३ च्या पत्राने सूचित केल्यानुसार

१. कोयना टप्पा-४(ब) व कोयना धरणाच्या सांडव्याच्या दरवाजांना झडपा बसविणे ही कामे महामंडळाने कोयना धरणातून पूर्वेकडे सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्यासाठीचे जे नियोजन केले आहे ते अबाधित ठेवण्याच्या अटीवर शासनाकडे वर्ग करण्यात यावीत.

२. कोयना टप्पा-४(ब) च्या प्रकल्प अहवालास महामंडळाने ५/२००० मध्ये दिलेली प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात यावी व वरील दोन्ही कामांसाठी शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान करावी. जेणेकरुन शासन स्तरावरुन निधी उपलब्ध करणे शक्य होईल.

३. कोयना धरणाच्या दरवाजांना झडपा बसविण्यासाठी महामंडळामार्फत उपलब्ध करुन दिलेला निधी शासनामार्फत महामंडळास समायोजनाच्या दृष्टीने परत मिळावा.''

ठराव क्र. ३७/४

''ठराव करण्यात येतो की,

१. एआयबीपी प्रकल्पांतर्गत उपलब्ध होणारा निधी ठराविक कालावधीत उपयोगात आणण्याच्या दृष्टीने एआयबीपी अंतर्गत कार्यान्वित करावयाची निवडक कामे, सदर कामांची तातडी व काम करणाऱ्या कंत्राटदारांची गुणवत्ता या बाबी तपासून सध्याच्या संबंधित प्रकल्पांच्या चालू

५/१२/०३

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

निविदेअंतर्गत करण्याचे अधिकार मा. अध्यक्षांच्या मान्यतेने कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.

२. एआयबीपी प्रकल्पांतर्गत उपलब्ध झालेला निधी ठराविक कालावधीत उपयोगात आणण्यासाठी प्रकल्पांची कामे चालू निविदेअंतर्गत अंतर्भूत करण्याबाबत मा. अध्यक्षांच्या मान्यतेने आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३७/५

''ठराव करण्यात येतो की, निविदा स्वीकृती लवाद, निर्णय व कंत्राटविषयक मागण्या/क्लेम्स याविषयीच्या निविदा समिती व क्लेम्स समिती यांची रचना खालीलप्रमाणे सुधारित करण्यास तसेच कार्यकारी संचालक, कार्यकारी समिती, निविदा समिती व क्लेम्स समितीचे मंजुरीचे अधिकार खालीलप्रमाणे ठेवण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे. सदर ठराव मा. मुख्य सचिवांच्या दृढीकरणासाठी शासनास सादर करण्यात यावा.

(अ) कार्यकारी संचालक

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निविदा अधिक्य | - | ५% पर्यंत प्रचलित दरसूचीनुसार अधिक्य मंजुरी |
| २. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा | - | बोली अंदाजपत्रकीय दराचे तुलनेत १०% पेक्षाही कमी (Below) प्रचलित दरसूची नुसार |

(ब) कार्यकारी समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निविदा अधिक्य | - | ५ ते १०% पर्यंत प्रचलित दरसूचीनुसार अधिक्य मंजुरी |
| २. | लवाद, निर्णय व कंत्राटविषयक मागण्या/क्लेम्स | - | रु.१५ लक्ष मर्यादेपर्यंत |

कार्यकारी समितीचे अधिकार (१ व २) मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या मंजुरीच्या अधीन राहतील.

(क) निविदा समिती

| निविदा समितीची रचना | वित्तीय अधिकार |
|---|---|
| सचिव (पा) व सदस्य - समिती प्रमुख<br>सचिव (लाक्षेवि) व सदस्य - समिती सदस्य<br>सचिव (साबां) म.शा. - समिती सदस्य<br>आंतरवित्त सल्लागार (पावि) - समिती सदस्य | १. १०% पेक्षा जास्त अधिक्य असलेल्या निविदा एकमताने मंजूर करणे.<br>२. रु.१५ लक्ष व ५० लक्ष पर्यंतचे लवाद निर्णय कंत्राटदारांच्या मागण्या/क्लेम्स |

| निविदा समितीची रचना | वित्तीय अधिकार |
|---|---|
| वित्त सदस्य, महामंडळ - समिती सदस्य<br>कार्यकारी संचालक, मकृखोविम - समिती सदस्य<br>संबंधित क्षेत्रीय मुख्य अभियंता - समिती सदस्य<br>अधीक्षक अभियंता (महामंडळ) - सदस्य सचिव | एकमताने मंजूर करणे.<br>३. वरील अधिकार मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या मंजुरीच्या अधीन राहतील. |

(ड) क्लेम्स समिती

| क्लेम्स समितीची रचना | वित्तीय अधिकार |
|---|---|
| सचिव (पा) व सदस्य - समिती प्रमुख<br>सचिव (लाक्षेवि) व सदस्य - समिती सदस्य<br>सचिव (साबां) म.शा. - समिती सदस्य<br>आंतरवित्त सल्लागार, पा.वि. - समिती सदस्य<br>वित्त सदस्य, महामंडळ - समिती सदस्य<br>कार्यकारी संचालक, मकृखोविम - समिती सदस्य<br>संबंधित क्षेत्रीय मुख्य अभियंता - समिती सदस्य<br>महामंडळाचे कायदे सल्लागार - समिती सदस्य<br>अधीक्षक अभियंता (महामंडळ) - सदस्य सचिव | रु. ५० लक्ष पेक्षा जास्त किमतीचे लवाद निर्णय कंत्राटदारांच्या मागण्या, दावे, क्लेम्स एकमताने मंजूर करणे, हे अधिकार मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या मंजुरीच्या अधीन राहतील. |

(इ) लवाद निर्णय व क्लेम्सच्या बाबत वरील कोणत्याही स्तरावर घेतलेले निर्णय कंत्राटदारास मान्य नसतील किंवा समितीमध्ये एकमत होत नसेल तर कार्यकारी संचालक ही बाब मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या मान्यतेनंतर नियामक मंडळासमोर अंतिम निर्णयार्थ सादर करतील.''

ठराव क्र. ३७/६

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील प्रकल्पांसाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजांच्या स्वामित्व शुल्क परताव्याबाबत शासन स्तरावर घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पाच्या स्वामित्व शुल्क परताव्यासंदर्भात मान्य झालेल्या प्रस्तावाचा अभ्यास करुन त्यातील मुद्यांच्या आधारे प्रस्ताव तयार करुन शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास, नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे.''

ठराव क्रमांक ३४/७

"ठराव करण्यात येतो की, समान पाणी वाटपासंदर्भात टेंभू, तारळी व उरमोडी प्रकल्पांचे लाभक्षेत्राबाहेरील गावांना समान वाटा मिळण्याच्या मागणीसंदर्भात तसेच अशा प्रकारच्या इतर मागण्यांबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करावी.

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे



कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

प्रकल्पांच्या नियोजनानुसार, प्रकल्प पूर्ण झाल्यावर नियोजनाप्रमाणे लाभक्षेत्रात पाणी दिल्यानंतर, पाण्याचा आढावा घेऊन पाणी शिल्लक राहिल्यास लाभक्षेत्राबाहेरील क्षेत्रास पाणी मिळण्याबाबतच्या मागण्यांचा विचार करण्यात यावा. अशा प्रस्तावाबाबत नियामक मंडळाच्या मान्यतेनंतर निर्णय कळविण्यात यावा."

## आयत्या वेळचे विषय

ठराव क्र. ३७/८

''ठराव करण्यात येतो की, वांग, उत्तरमांड, मोरणा (गुरेघर), नागेवाडी मध्यम प्रकल्पांच्या मातीकामाच्या निविदांमधील खंड-४ मध्ये समाविष्ट केलेली स्वामित्व शुल्क परतावा न मिळण्याबाबतची शर्त मूळ निविदेतील शर्त क्र.३६ शी विसंगत असल्याने, तसेच सदरची शर्त वगळण्यास शासनाने मान्यता दिली असल्याने, याबाबतची खंड-४ मधील शर्त वगळण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. ''

ठराव क्र. ३७/९

''ठराव करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या एआयबीपी संनियंत्रण पथकाने सुचविल्यानुसार, शासनाने ठरवून दिलेली एआयबीपी प्रकल्पांच्या देयकांच्या प्रदानाची, प्रचलित कार्यप्रणाली सुधारित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. ''

ठराव क्र. ३७/१०

''ठराव करण्यात येतो की, नेचर क्लब, मायणी ता. खटाव, जि. सातारा या संस्थेस मायणी तलावाच्या पूर्व भागातील १०० एकर जमीन वृक्षारोपण व फलोत्पादनासाठी देण्याच्या भाडेकराराची मुदत दि.२८.११.२००३ च्या पत्रातील अटींच्या अधीन राहून ५ वर्षाऐवजी ३० वर्षे करण्यास विशेष बाब म्हणून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३७/११

''ठराव करण्यात येतो की, अवर्षणप्रवण क्षेत्रातील प्रकल्पांची निवडक कामे करण्यासाठी राज्य शासनामार्फत उपलब्ध करुन दिलेला निधी विहीत कालावधीत उपयोगात आणण्याच्या दृष्टीकोनातून, सदर निधी ज्या प्रकल्पांसाठी देण्यात येणार आहे अशा प्रकल्पांची सध्या बंद असलेली कामे प्राथम्याने चालू करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३७/१२

''ठराव करण्यात येतो की, सातारा जिल्ह्यातील श्री. शशिकांत शिंदे, विधानसभा सदस्य व इतर लोकप्रतिनिधींच्या कोरेगांव, खटाव इ. तालुक्यांतील मागण्यांसाठी, तारळी

धरणाच्या सांडव्याच्या दरवाजांना फ्लॅप्स लावून उपलब्ध होणारे पाणी देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३७/१३

''ठराव करण्यात येतो की, खोडशी बंधाऱ्यासाठी १९७६ च्या लवाद निर्णयानुसार, संरक्षित केलेल्या वापरानुसार पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी, उस्त्रोत भागातील प्रकल्पांचे संयुक्त नियोजनाचा अभ्यास करावा व त्यानुसारचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करावा.''

ठराव क्र. ३७/१४

''ठराव करण्यात येतो की, सोनहिरा साखर कारखान्याच्या वतीने ताकारी उपसा सिंचन योजनांच्या लाभक्षेत्रात पोट कालव्यांच्या करण्यात येणाऱ्या कामांच्या खर्चाच्या परताव्यासंदर्भात सचिव (पा) व सचिव (लाक्षेवि) यांनी अभ्यास करुन सुचविलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी व नियामक मंडळाच्या पुढील बैठकीत प्रस्तावास मान्यता घ्यावी.''

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे



५।१२।०३
कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

परिशिष्ट क्र. १

## सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आलेले प्रकल्प

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत रु. कोटी | दरसूची |
|---|---|---|---|
| **अ.** | **मोठे प्रकल्प** | | |
| १. | कृष्णा प्रकल्प, जि. सातारा | ६४८.०५ | २००२-२००३ |
| २. | टेंभू उपसा सिंचन योजना, जि. सांगली | २१०६.०९ | २०००-२००१ |
| ३. | कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना जि. सांगली | १९८२.८१ | २०००-२००१ |
| ४. | भीमा प्रकल्प, जि. सोलापूर | १४०५.६७ | २०००-२००१ |
| **ब.** | **मध्यम प्रकल्प** | | |
| १. | मोरणा (गुरेघर) प्रकल्प, ता. पाटण, जि. सातारा | ११८.०३ | २००१-२००२ |
| **क.** | **लघु पाटबंधारे प्रकल्प** | | |
| १. | काष्टी को.प.बंधारा, ता. श्रीगोंदा,जि. अहमदनगर | ३.०४ | १९९९-२००० |
| २. | आंधळी प्रकल्प, ता. माण, जि. सातारा | १७.९७ | २००१-२००२ |
| ३. | साठवण तलाव माळेगांव (पा), ता. उमरगा, जि. उस्मानाबाद | ४.०३ | १९९९-२००० |
| ४. | तुरोरी लघु प्रकल्प, ता. उमरगा,जि. उस्मानाबाद | १२.०८ | १९९९-२००० |
| ५. | हेरे ल. पा. प्रकल्प, ता. चंदगड | ९.०४ | २०००-२००१ |
| ६. | को.प. बंधारा नारायणगांव (जेधेचा डोह) ता. जुन्नर, जि. पुणे | ०.८३ | १९९६-१९९७ |

**मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,**
**म.कृ.खो.वि.म., पुणे**

**कार्यकारी संचालक,**
**म.कृ.खो.वि.म., पुणे**